**<u>उलटपास वादी तर्फे वकील श्री. एस्. एन्. भणगे यांचे मार्फत</u>**

३९. मागील तारखेस उलटतपास झालेनंतर मी त्याबाबत दाव्याची माहिती असलेले माझे भाऊ यांचेशी बोलणी केली.

४०. मी असे सांगितले नाही की भावाकडे पावत्या आहेत. साक्षीदाराला परिच्छेद क्र. ३५ मध्ये विचारलेल्या प्रश्नाबाबत साक्षीदाराने दिलेल्या उत्तराकडे त्याचे लक्ष वेधले.

प्रश्न— सदर उत्तराबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर— मी पुन्हा सांगतो की मी तसे सांगितले.

४१. मी माझे भावाकडे त्या पावत्यांबाबत विचारणा केली. त्यानी सांगितले की पावत्या शोधल्या पण मिळाल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की खंडाच्या पावतीची स्थळप्रत ही देवस्थानाकडे असते व त्याची प्रत कुळाला दिली जाते. खंडाच्या पावत्यांची स्थळप्रत देवस्थानाकडे आहे किंवा कसे याबाबत मी किंवा माझे भावाने खात्री केली नाही.

४२. मला जमिनीची पिकपहाणी केली जाते याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की मला पिकपहाणीची माहिती नसल्यामुळे माझे म्हणण्यानुसार मी दावा जमिनीमध्ये आंबा, काजु, कोकम, सुरंग आणि माड जी काही झाडे लावलेली आहेत त्याची नोंद सातबारा सदरी झाली हे पहाण्याचा प्रश्न मला व माझे कुटुंबाला आला नाही.

प्रश्न— तुमच्या सरतपासामध्ये तुमच्या वकिलांनी तुम्हाला कागद दाखविले व त्यातील मजकुर, त्यातील नावे इ. गोष्टी तुम्ही सांगितल्या त्या तुम्ही कागद वाचूनच सांगितल्या?

उत्तर— मला वाचता येत नाही.

४३. प्रस्तुत कामाबाबत देवस्थानात काय अफरातफर झाली असल्यास मला

माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की वादीच्या वडिलांचे नाव गोविंद बाळकृष्ण येसजी आहे व त्याचे आजोबांचे नाव बाळकृष्ण महादेव येसजी आहे. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस दावा दाखल करण्यात आला त्यावेळेस देवस्थानाचे अध्यक्ष प्रसन्ना महाबळेश्वर प्रभु असे होते. हे म्हणणे खरे आहे की दावा प्रलंबीत असताना व्यवस्थापन समितीमध्ये बदल झालेला आहे. देवस्थानाचे अध्यक्ष आता राय म्हणुन आहेत. हे म्हणणे खरे आहे की प्रसन्ना महाबळेश्वर प्रभु यांचेशी आमचे कुटुंबाची कोणतीही वाकडिक नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा दाखल केला त्यावेळेस देवस्थानाचे सचिव गणेश उर्फ रवि रघुनाथ रेघे होते. हे म्हणणे खरे आहे की त्यांचा व आमचे कुटुंबाची कोणतीही वाकडिक नाही.

४४. दावा जमिनीचा विषय बाजुला ठेवून आरवली गावामध्ये आमच्या कुटुंबाच्या २० ते २२ जमिनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की आमच्या कुटुंबाच्या नावे असणा—या जमिनीचा दस्त आमचे कुटुंब भरते. हे म्हणणे खरे आहे की आमच्या जमिनी आमच्या कुटुंबाच्या नावे आहेत याबाबतची खात्री आमचे कुटुंब मुलखी अधिका—याकडे करतात. हे म्हणणे खरे आहे की दावा दाखल करण्याच्यापूर्वी दावा मिळकत कोणाच्या नावे आहे याची खात्री करण्याचा प्रश्न आमचे कुटुंबाला आला नाही.

४५. हे म्हणणे खरे आहे की आम्ही दावा मिळकतीतील झाडे तोडल्याबाबत जी काही तक्रार केलेली आहे ती दावा दाखल झाल्यावर केलेली आहे. मला याची माहिती आहे की आरवली देवस्थान हे गरजु लोकांना आर्थिक सहाय्य करते. हे म्हणणे खरे आहे की देवस्थानाचे देवस्थापक म्हणुन पाटकर नावाची व्यक्ती काम पाहत होती. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत**

Digitally signed by Vinayak Dattatray Patil
Date: 2020.02.01 11:58:58 +0530

DISTRICT COURT, MAHARASHTRA

दिनांक :— २९/०१/२०२०. दिवाणी न्यायाधाश (क.स्तर) वेंगुर्ला.